**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक ११ जून २०२५**

**ठळक बातम्या**

**1. गेल्या ११ वर्षात वाढलेल्या दळणवळण आणि पायाभूत सुविधांमुळे नागरिकांच्या राहणीमानात सुधारणा झाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**

**2. अकोल्यात अडीच हजार कोटींपक्षा अधिक निधीतून होणार विकासकामे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज विविध 21 कामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण.**

**3. महसुल खात्याचे क्रांतीकारी निर्णय जिल्हास्तरावर त्वरीत राबविण्यात यावे- महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश.**

**4. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने प्रशासकीय प्रक्रियांना वेग.**

मोदी ११ वर्ष

अत्याधुनिक पायाभूत सुविधा निर्मितीत भारताने घेतलेली झेप ही शाश्वतता आणि दूरदृष्टी या वैशिष्ट्याने प्रेरित आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पायाभूत सुविधांमधल्या क्रांतीची अकरा वर्षे असं मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या संदेशात नमूद केलं आहे. रेल्वे, महामार्ग, बंदरे, विमानतळ यासारख्या दळणवळण आणि पायाभूत सुविधांमुळे राहणीमानातील सुविधा तसंच समृद्धीत वाढ झाल्याचं त्यांनी म्हटलं आहे. या वैशिष्ट्यांमुळे आत्मनिर्भर भारताचा पाया घातला गेल्यांचं या संदेशात नमूद केलं आहे.

अश्विनी वैष्णव

भांडवली खर्चात गेल्या अकरा वर्षांमध्ये लक्षणीय वाढ होऊन तो २०२४-२५ मध्ये ११ लाख कोटींवर पोचला असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. रालोआ सरकारने अकरा वर्ष पूर्ण केल्याबद्द्ल लिहिलेल्या लेखात वैष्णव यांनी गेल्या दशकभरात प्रत्यक्ष पायाभूत सुविधांमध्ये वेगाने वाढ झाल्यांचं म्हटलं आहे. एकूण ५९ हजार किलोमीटर रस्ते आणि ३७ हजार ५०० किलोमीटर रेल्वे मार्गांचं काम या काळात झाल्याचं त्यांनी या लेखात नमूद केलं आहे. हर घर जल या योजने मार्फत १ कोटी ४० लाख घरांपर्यंत नळाचे पाणी पोचले आहे तर आयुष्मान भारतमुळे ३ कोटी ५० लाख व्यक्ती आरोग्यविम्याच्या छत्राखाली आल्याचं त्यांनी या लेखात नमूद केलं आहे. याशिवाय गेल्या दहा वर्षामध्ये ५३ कोटींहून जास्त जनधन खाली उघडली गेली आहेत. ४० दशलक्ष घरं आणि १२० दशलक्ष शौचालयं बांधली गेली तर १० कोटी कुटुंबांमध्ये लाकडांऐवजी स्वयंपाकाच्या गॅसचा वापर होऊ लागला आहे असंही वैष्णव यांनी या लेखात नमूद केलं आहे.

११ वर्ष-सांस्कृतिक आयोजने

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळं, भारतानं गेल्या दशकात, उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. आकाशवाणी न्यूज श्रोत्यांसाठी, गेल्या अकरा वर्षात, प्रमुख क्षेत्रांमधील सरकारच्या प्रयत्नांवर एक विशेष लेख-मालिका सादर करत आहे. त्यात आज, सांस्कृतिक आणि देशभक्तीपर कार्यक्रमांवर आधारित हे वृत्त, देत आहेत, वृत्त विभागातून हेमांगी कुळकर्णी.......

***"गेल्या दशकात सरकारनं भारताच्या खऱ्या राष्ट्रनिर्मात्यांचा सन्मान करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावलं उचलली आहेत. स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या आझादी का अमृत महोत्सवासारख्या मोहिमांनी देशभरात सांस्कृतिक आणि देशभक्तीपर कार्यक्रमांद्वारे राष्ट्राच्या बलिदानाचा आणि कामगिरीचा उत्सव साजरा करण्यात आला. प्रधानमंत्री संग्रहालय, राष्ट्रीय पोलिस स्मारक, आदिवासी स्वातंत्र्यसैनिक संग्रहालये, भारत मंडपम आणि नवीन संसद भवन यासारख्या दीर्घकाळ प्रलंबित स्मारकांचे राष्ट्रीय एकतेच्या अभिमानास्पद प्रतीकांमध्ये रूपांतर झाले आहे.६६ कोटींहून अधिक भाविकांचा सहभाग असलेल्या महाकुंभ २०२५ सारख्या कार्यक्रमांनी विविधतेत एकता साजरी हि भावना बळकट झाली. दरम्यान, बौद्ध शिखर परिषद आणि शीख गुरुंच्या प्रकाश पर्व यासारख्या जागतिक कार्यक्रमांनी भारताच्या आध्यात्मिक वारशाला झळाळी दिली.***

***२३ कोटींहून अधिक लोकांच्या सहभागामुळे आणि २०२४ मध्ये नवीन जागतिक विक्रम प्रस्थापित झाल्यामुळे, योग ही एक जागतिक चळवळ बनली आहे. आयुर्वेद भारताला समग्र आरोग्यसेवेचे केंद्र म्हणून देखील स्थापित करत आहे. आयुर्वेदाला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळत आहे. याव्यतिरिक्त, वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट (WAVES) सारखे कार्यक्रम जागतिक व्यासपीठावर भारताच्या मीडिया आणि मनोरंजन प्रतिभेचे प्रदर्शन करत आहेत. सण आणि योगापासून ते संगीत आणि कला पर्यंत, आपली संस्कृती आता अनेक देशांमध्ये आचरणात आणली जात आहे. आज, भारताची समृद्ध संस्कृती जगभरात प्रकाश पसरवत आहे."***

मुख्यमंत्री अकोला दौरा

अकोला जिल्ह्यात सुमारे अडीच हजार कोटींहून अधिक रूपयांच्या निधीच्या विविध २१ विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज झाले. सिंचन, रस्ते, रूग्णालय सुधारणा, सांस्कृतिक भवन, तरण तलावासह विविध प्रशासकीय इमारती अशा विकास कामांमुळे जिल्ह्यातील विकासाचा प्रवाह गतिमान होणार आहे.फडणवीस यांच्या हस्ते सर्वप्रथम जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन, अद्ययावत व सुसज्ज इमारतीचे लोकार्पण झाले.

***अकोल्याचं जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी विशेषतः आमच्या शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज मिळाली पाहिजे म्हणून सौर ऊर्जा प्रकल्पाचे १० मेगावट्टचे काम असेल तर म्हणजे १९ कामाचं उद्घाटन आणि भूमिपूजन हे आपण आज या ठिकाणी केला. सत्ताविशे कोटी रुपये या ठिकाणी या जिल्ह्याला मिळाले.***

त्यानंतर नियोजन भवनात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते एकाचवेळी ऑनलाईन पध्दतीने विविध विकास कामांचा शुभारंभ झाला.अकोला येथील तहसील, तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या अद्ययावत इमारतीचे तसेच महिला व बालविकास भवनाचे लोकार्पण झाले. पूर्णा नदीवरील काटीपाटी बॅरेज प्रकल्पाचे भूमीपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. सुमारे ४५४ कोटी रूपयांच्या निधीतून सिंचनाची व्यवस्था निर्माण होऊन शेतकरी बांधवांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून कृषी संशोधनाचा वारसा असलेल्या अकोला भूमीत २४९ कोटी रूपये खर्चून बांधण्यात आलेल्या पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाच्या इमारतीचा कोनशिला समारंभही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाईन पध्दतीने झाला.

चंद्रशेखर बावनकुळे

महाराष्ट्र सरकारने महसुल विभागामध्ये महत्त्वाचे निर्णय घेतले असून, अनेक नवीन उपक्रम सुरू केले आहेत. यामुळे राज्याच्या विकासाला गती मिळणार असून, नागरिकांना दिलासा मिळावा याकरिता राज्याचे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गेल्या काही दिवसात राज्यस्तरावर निर्णय पारीत केले आहेत. महसुल खात्याचे क्रांतीकारी निर्णय जिल्हास्तरावर त्वरीत राबविण्यात यावे असे निर्देश महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे. राज्याचे वाळू-रेती निर्गती धोरण-2025 जाहीर झाले आहे. यानुसार, वाळू डेपो पद्धत बंद करून, लिलाव पद्धतीने वाळूची विक्री होणार आहे. तसेच, 10 टक्के वाळू घरकुल बांधकामासाठी आरक्षित ठेवण्यात आली आहे. 'वन स्टेट, वन रजिस्ट्रेशन' सुरू झाल्याने राज्यातील कोणत्याही उपनिबंधक कार्यालयात मालमत्ता कागदपत्रांची नोंदणी करणे शक्य होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान हे जनतेच्या महसुली समस्यांचे निराकरण करण्यासाठी राबवले जात आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने प्रशासकीय प्रक्रियांना वेग आला असून राज्य सरकारने काल महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना प्रभागरचना करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार अ, ब आणि क वर्ग महापालिकांची प्रभागरचना होणार आहे. यात छत्रपती संभाजीनगरसह पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, पिंपरी चिंचवड, नवी मुंबई, वसई विरार आणि कल्याण डोंबिवलीसारख्या महापालिकांचा समावेश आहे. राज्यात ४ वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आता त्यासंबंधी हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत.

हवामान

येत्या काही तासात बुलढाणा, अकोला, अमरावती, वाशिम, गडचिरोली, विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी गडगडाटी वादळे आणि विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

योग पोर्टल

सर्वांगीण आरोग्य आणि निरामय जीवनाला प्रोत्साहन  देण्याच्या भारताच्या नेतृत्वाचा एक सामर्थ्यशाली दाखला म्हणून, 21 जून रोजी आयोजित 11 व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमाने (योग संगम) एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. देशभरातील सुमारे 50,000 संस्थांनी 21 जून 2025 रोजी सकाळी  6:30 to 7:45 वाजेपर्यंत होणारा योग संगम कार्यक्रम आयोजित करण्यासाठी नोंदणी करुन सामूहिक सहभागाच्या क्षेत्रात एक नवीन मापदंड प्रस्थापित केला आहे.

दृष्टीदिन साजरा

गडचिरोली  इथल्या जिल्हा सामान्य रुग्णालयात काल दृष्टीदिन साजरा करण्यात करुन नेत्रदान व अन्य विषयांवर मार्गदशन करण्यात आले.जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.माधुरी किलनाके, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सतीशकुमार सोळंकी, राष्ट्रीय अंधत्व निवारण समितीचे जिल्हा कायक्रम अधिकारी डॉ.किरण मडावी यांनी नेत्रदानासंबंधी मार्गदर्शन केले.२४ जूनपर्यंत दृष्टीदिन पंधरवडा साजरा करण्यात येणार असून, जास्तीत जास्त मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आल्याची माहिती यावेळी अतिथींनी दिली. शिवाय नेत्रदानाबाबत विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

*****